महाराष्ट्र पोलीस

# प्रसिद्धिपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६
फोन नं. ०२०-२६६८५०००

PUNE CITY TRAFFIC POLICE

जा.क्र./पोउआ/वाह/६८०१ /२०२४ पुणे  दिनांक – २४/०९/२०२४

दि. २६/०९/२०२४ रोजी मा. व्हि.व्हि.आय.पी. यांचा पुणे दौरा असल्याने, पुणे शहरातील सर्व वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/ टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, सर्व वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**मा. व्हि.व्हि.आय.पी. यांचा दि. २६/०९/२०२४ रोजी पुणे दौरा आहे. दौऱ्यामध्ये मा. व्हि.व्हि.आय.पी. ०३ ठिकाणी भेट देणार आहेत त्या अनुषंगाने खालील नमुद रस्त्यांवर १५.०० वा. पासुन आवश्यकतेनुसार वाहतुकीमध्ये बदल करण्यात येत आहेत.**

**१) सावरकर पुतळा चौक ते सारसबाग – पुरम चौक दरम्यान सर्व वाहनांना प्रवेश बंद राहील**

➢ **पर्यायी मार्ग –**

A) सिंहगड रोडवरुन सावरकर चौक उजवीकडे वळण घेवुन मित्रमंडळ चौक ते व्होल्गा चौक मार्गे इच्छित स्थळी जावे.

B) मित्रमंडळ चौक कडुन सावरकर चौक डावीकडे वळण घेवुन सिंहगड रोड जक्शंन वरुन इच्छित स्थळी जातील

**२) जेधे चौक ते सातारा रोड प्रवेश बंद राहील.**

➢ **पर्यायी मार्ग –** टिळक रोड व शिवाजी रोडवरुन येणाऱ्या वाहनांनी जेधे चौक मधुन डावीकडे वळण घेवुन सेवन लव्हज चौक उजवीकडे वळण घेवुन वखार महामंडळ उजवीकडे वळण घेवुन मार्केट यार्ड जक्शंन वरुन सातारा रोडला जातील.

**३) ७ लव्हज चौक ते जेधे चौक प्रवेश बंद राहील.**

➢ **पर्यायी मार्ग –** ७ लव्हज चौक डावीकडे वळण घेवुन वखार महामंडळ उजवीकडे वळुन सातारा रोड वरुन इच्छित स्थळी जातील

**४) व्होल्गा चौक ते जेधे चौक प्रवेश बंद राहील.**

➢ **पर्यायी मार्ग –** १. व्होल्गा चौक डावीकडे वळण घेवुन सावरकर चौक मार्गे इच्छितस्थळी जातील.
२. सातारा रोडवरील वाहने मार्केट यार्ड जक्शंन येथुन उजवीकडे वळण घेवुन वखार महामंडळ चौक डावीकडे वळण घेवुन ७ लव्हज चौकामधुन इच्छित स्थळी जातील.

## सिव्हील कोर्ट मेट्रो स्टेशन परीसर

**१) कामगार पुतळा ते शिवाजी चौक दरम्यान दोन्ही बाजुने प्रवेश बंद (रानडे पथ)**

➢ **पर्यायी मार्ग –** १. कामगार पुतळा ते शाहीर अमर शेख चौक मार्गे इच्छित स्थळी जातील
२. शिवाजी चौक सरळ मंगला सिनेमा समोरुन कॉंग्रेस हाऊस रोडवरुन इच्छितस्थळी जातील.

२) **तोफखाना चौक ते कोर्टाकडे प्रवेश बंद (रानडे पथ)**

➢ **पर्यायी मार्ग** – तोफखाना चौक डावीकडे वळण घेवुन म.न.पा. समोर खुडे चौक मधुन इच्छित स्थळी जातील

## आंबील ओढा परीसर

१) **ना.सी.फडके चौक ते नाथ पै चौक प्रवेश बंद**

➢ **पर्यायी मार्ग** – ना.सी.फडके चौक डावीकडे वळण घेवुन निलायम ब्रिज खालुन सिंहगड रोड वरुन इच्छित स्थळी जातील.

➢ **पर्यायी मार्ग** – नाथ पै चौक ते सरळ सिंहगड रोड जक्शंन वरुन इच्छित स्थळी जातील

२) **बाबुराव घुले पथ पथावरुन टिळक कॉलेज चे पुढे आंबील ओढा जंक्शन कडे प्रवेश बंद**

➢ पर्यायी मार्ग – टिळक कॉलेज चौकामधुन उजवीकडे वळन घेवुन जॉगर्स पार्क रोड वरुन शास्त्री रोडवर येवुन इच्छितस्थळी जावे.

३) **सानेगुरुजी पथ** - टिळक रोड जंक्शन जे निलायम ब्रिज पर्यंत सर्व प्रकारचा वाहनांसाठी नो पार्कीग करण्यात येत आहे.

(अमोल झेंडे)
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति,

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी**, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- २)**सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ३**, पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरुम**, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / ट्विटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.